Open Access

# उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 814 – 817
DOI: 10.5281/zenodo.10280162

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींची स्वदेशी संकल्पना

प्रा. शिंदे पूनम सुंदर

तत्त्वज्ञान विभाग, मांजरा महाविद्यालय, कण्हेरी लातूर ४१३५१२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: shindepoonam845@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 27 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

राष्ट्रपिता मोहनदास करमचंद गांधी यांची स्वदेशी संकल्पना ही एक स्वतंत्र्याचा भाग होती. जी 1905 मध्ये भारताला स्वराज्य मिळवून देण्याच्या दृष्टीने एक साधन म्हणून वापरली गेली. त्यांच्या चळवळीत उद्देश भारतामध्ये ब्रिटिशांच्या उत्पादित वस्तू नष्ट करणे व भारतीय अधिक वस्तू वापरणे हा होता. या चळवळीमध्ये आयात केलेल्या वस्तूची विक्री करणाऱ्या दुकानाच्या बाहेर आंदोलन करणे आणि लोकांना परदेशी वस्तू ऐवजी स्थानिक पातळीवरील उत्पादित वस्तू खरेदी करण्यास प्रोत्साहन करणे. समाविष्ट होते.

सत्याग्रह जीवनपद्धतीसाठी गांधींनी दिलेल्या अकरा प्रतिज्ञांपैकी हे एक होती. सत्याग्रह आणि स्वदेशी हे गांधींच्या जीवन तत्वज्ञानात मूलभूत आहेत. गांधींच्या मते, माणसाच्या क्रियाकलापांचा संपूर्ण भाग एक अविभाज्य संपूर्ण बनतो. जीवनाला सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक इत्यादी पाणथळ कप्प्यांमध्ये विभागले जाऊ शकत नाही. त्यामुळे सत्याच्या अथक प्रयोगातून त्यांनी विकसित केलेल्या कल्पना आणि संकल्पना हा जीवनाच्या विविध पैलूंची सांगड घालण्याचा प्रयत्न होता. स्वदेशी संकल्पनाही त्याला अपवाद नव्हती. तो केवळ आर्थिक सिद्धांत नव्हता. किंबहुना स्वदेशीच्या संकल्पनेत मानवी जीवनाचे सर्व पैलू समाविष्ट आहेत

## एकादशी व्रत

महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेला गेले ते वीस वर्षानंतर भारतात आले त्यानंतर गुजरातमधील साबरमती येथे सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली महात्मा गांधींनी स्वतःसाठी व आश्रमासाठी काही प्रतिज्ञा (आदर्श) केल्या होत्या त्यांचे

पालन करणे हे प्रत्येक आश्रमावासीयाचें पवित्र कर्तव्य होते. ह्या प्रतिज्ञा गांधीजींचे अकरावे उपोषण म्हणून ओळखले जाते. म्हणून याला अकरा व्रताची संकल्पना किंवा एकादशी व्रत असेही संबोधले जाते.

गांधीजींनी सांगितलेली प्रतिज्ञा पुढील प्रमाणे

**सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह, आस्वाद, निर्भयता, अस्पृश्यता निवारण, शारीरिक श्रम, सहिष्णुता, स्वदेशी**.

प्रस्तुत लेखात आपण **स्वदेशी** संकल्पना पाहणार आहोत.

**स्वदेशी**

स्वदेशी म्हणजे आयात केलेल्या वस्तूवर अवलंबून न राहता स्वतःच्या देशात आवश्यक वस्तूंचे उत्पादन करणे आणि त्याचा वापर करणे, गांधीजींचा असा विश्वास होता की स्वदेशी वस्तूंच्या वापरामुळे आपण स्वावलंबी बनू शकतो आणि आयात केलेल्या वस्तूवरील आपले अवलंबित्व दूर करू शकतो. गांधीजींनी अगंमेहनतीवर आणि चरखा आणि खादीच्या वापरावर भर दिला.

**गांधीजींचे स्वदेशी बाबत विचार**

ज्या धंद्यावरील अर्थव्यवस्था व मार्गदर्शन हे हिंदू लोकांच्या हातात असेल तर ते धंदा स्वदेशी होय. जेव्हा हिंदुस्थानाला गरज असेल तेव्हा विदेशी भांडवल वापरण्याला किती विदेशी तंत्रज्ञ नेमण्याला गांधीजींचा विरोध नाही मात्र ते भांडवल व तंत्र हिंदू भारतीय लोकांच्या सत्तेखाली व्यवस्थे खाली व मार्गदर्शनाखाली पूर्णपणे राहिले पाहिजे आणि याचा उपभोग हिंदुस्तानच्या विकासासाठी झाला पाहिजे.

**विदेशी कापडावरील बहिष्कार**

आपल्या जीवनाला वायू तसा राष्ट्राच्या जीवनाला स्वदेशी आवश्यक आहे कोणतीही वस्तू लक्षवधी हिंदी लोकांचे कल्याण साधत असेल तर ती स्वदेशी होय मग तिचे भांडवल ज्ञान परके असले तरी चालेल मात्र ती हिंदी लोकांच्या पूर्ण हुकुमेखाली असली पाहिजे. महात्मा गांधी जेव्हा परदेशी कपड्यांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन करीत होते, तेव्हा ते चरख्यावर सूत कातून तयार केलेले कपडे वापरण्यासही सांगत होते. “तुम्ही जे उत्पादित करता, तेच वापरा”, असा त्यांचा आग्रह होता. चरख्यावर उत्पादित केलेले कापड आपल्याला पुढे घेऊन जाईल, असे त्यांचे मत होते.

**सर्वात उत्तम व स्वस्त असेल ती वस्तू घ्यावी**

हा नियम नेहमीच बरोबर ठरत नाही ज्याप्रमाणे आपण आपला देश सोडून कधीच अधिक चांगल्या हवामानाच्या देशात जात नाही तर स्वदेशातील सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो त्याप्रमाणे चांगल्या किंवा स्वस्त अशा विदेशी वस्तूसाठी आपण स्वदेशी वस्तूचा त्याग करू नये. आपल्यामध्ये जर खरी स्वदेशी वृत्ती असेल तर आपण आपल्या महत्त्वाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पाश्चात्याकडे पाहणे सोडून देऊ व आहे त्यात समाधानी राहू.

१९१५ साली गांधीजी हिंदुस्तानात येत असताना असे दिसले की स्वदेशीचा मध्यबिंदू खादी हा आहे खादी गेली तर स्वदेशी राहणार नाही आणि अगोदरच हिंदुस्तानात  आज परदेशी माल आणून ओतल्याने देश बांधव भिकेला लागले आहेत.

गांधीजींनी केवळ विदेशी मालावरील सुलबुडीचा बहिष्कार नको होता तर आपल्या उद्धारासाठी सर्वच विदेशी मालावर तो हवा होता १९२१ साली असहकारतीच्या चळवळीत मुंबई येथे विदेशी मालाच्या मोठमोठ्या टोळया झाल्या परदेशी मालाची होळी करून आपण परदेशी चैनीच्या वस्तूची आपली चटक जाळीत आहोत विदेशी मालाची होळी म्हणजे विदेशी माणसाला शासन करणे हा नसून स्वतःला शासन करणे हा आहे. हिंदुस्थानातील उघड्या बाघड्या लाखो लोकांना दान धर्माची गरज नाही तर आपल्या घरात बसून सहजपणे करता येणाऱ्या कामाची गरज आहे आणि असे काम स्वदेशी वस्तू वापरल्या तरच मिळू शकेल अन्यथा नाही असे गांधीजीचे म्हणने होते.

**परीक्षण**

महात्मा गांधीजींनी स्वदेशी संकल्पनेचा अतिव्यापक दृष्टीने विचार केलेला आहे स्वदेशीचे महत्त्व त्यांनी केवळ लोकांना सांगून थांबले नाही तर त्यांचे काटेकोरपणे पालनही त्यांनी केले त्यांनी स्वदेशी आंदोलनातून तीन गोष्टीची प्रेरणा घेतली एक आर्थिक व राजनैतिक स्वावलंबाच्या आधारावरून ग्रामीण समाजाची एकी निर्माण करणे दोन सत्याग्रह तीन राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार.

अर्थाशिवाय पुरुष सुद्धा दास बनतो राजनीतिक गुलामी हे परंपरा अवलंबाचे प्रतीक आहे परावलंबाचे पारंतंत्र्य आहे तर स्वावलंबच स्वराज्य आहे. जरी आपण स्वराज्यातच वावरत असलो तरी भोजन, वस्त्र, अन्न, दैनंदिन वस्तूंसाठी आपण दुसऱ्या कोणावरही अवलंबून असलो तर तो स्वाभिमानी ठरणार नाही असे गांधीजींचे म्हणने होते.

गांधीजींनी स्वदेशी आंदोलनाची चळवळ ग्राम उद्योगाकडे वळवली त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था स्वावलंबी झाली त्यांना जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध झाला अर्थात गांधींच्या संकल्पनेचा अर्थ म्हणजे आर्थिक पोषण स्वतंत्रता व स्वावलंबता होय. त्यांच्या मते उद्योगात केंद्रीकरण शोषण हिंसा अभिप्रेत आहे अंततः त्यांनी त्यांचा विरोध करून विकेंद्रीकरण यावर प्रकाश टाकला.

गांधीजींच्या स्वदेशी संकल्पनेत समाजाची एकता व आत्मनेर्ता अभिप्रेत आहे स्वदेशी मध्ये उत्पादन मुख्यतः उपभोगात साठी असते ते बाजारात विकण्यासाठी किंवा पैसा कमावण्यासाठी नसते त्यामुळे गाव व शहरांमध्ये चांगला संबंध राहील त्यामुळे शहराकडून गावचे शोषण होणार नाही इंग्रजांनी शहराच्या माध्यमातून भारताचे शोषण केले व शहराचे गावाचे शोषण केले त्यांच्या मते स्वावलंबाच्या अर्धनीतीमुळे एका राष्ट्रात दुसऱ्या राष्ट्राचे शोषण करू शकणार नाही

आणि या पद्धतीने खऱ्या आंतरराष्ट्रीयतेचा विकास होईल यासाठी स्वदेशीला चांगला विश्व संबंधाचे प्रतीक म्हणायला पाहिजे.

**स्वदेशी चा प्रभाव**

ऑगस्ट २०१५ रोजी **पंतप्रधान नरेंद्र मोदी** यांनी देशी **हातमाग** आणि खादी उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी भारतातील पहिल्या वार्षिक राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त साजरा केला. ही तारीख निवडली गेली कारण ७ ऑगस्ट १९०५ रोजी स्वदेशी चळवळीची घोषणा विदेशी माल टाळण्यासाठी व केवळ भारतीय निर्मित उत्पादने वापरण्यासाठी

केली गेली. सरकारच्या **मेक इन इंडिया** उपक्रमाचा भाग म्हणून **आयुष मंत्रालयाचे** राज्यमंत्री **श्रीपाद नाईक** यांनी २०१७ मध्ये स्वदेशी शॉपिंगला (लघु आणि मध्यम आकाराच्या उद्योगांचे बाजार) प्रोत्साहन दिले.